कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी

त. हिंगणा जिल्हा नागपूर

जा.क्र./न.प.वा./न.र.वि/भो.प्र./२६०२
दिनांक ०२/०९ २०२२

प्रति,
श्री. दिनेश उत्तमराव पाटणे व सौ. वैशाली दिनेश पाटणे,
हिंगणा रोड, वानाडोंगरी, तह, - हिंगणा, जिल्हा - नागपूर.

विषय : महाराष्ट्र शासनाचे नगर पालिका, नगर पंचायत हद्दीकरीता लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार भोगवटा (Occupancy Certificate) प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ : १) आपले विहीत नमुन्यातील पुर्णत्वाचे प्रमाणपत्र क्र. २६२२ दि. २८/०६/२०२२ नुसार.
२) नगरपरिषद वानाडोंगरी बांधकाम परवाना क्र. न.प.वा./न.र.वि./बांध.मंजुरी/१०५७ दि. २५/११/२०२१.

मौजा वानाडोंगरी प.ह.न. ४६ खसरा क्र. २९३ /अ, २९३/१ब प्लॉट क्र. आर-१७, आर-१८ क्षेत्रफळ ३३१.४६८ चौ.मी. वरील संदर्भित पत्र २ अन्वये परवाना प्राप्त इमारत बांधकाम एम.डी. पडोळे, वास्तुविशारद नागपूर यांचा परवाना क्र. आर्क. एन.आय.टी.एल.एस. २०९० एन.एम.सी.एल.एस. एल-४४७ यांचे देखरेखीखालील पुर्ण केल्याचे संदर्भिय पुर्णत्वाचे प्रमाणपत्रावरून दिसून येते. उक्त बांधकाम इमारतीचा ताबा घेऊन उपभोग घेण्याबाबत खालील अटी व शर्तीवर मंजुरी देण्यात येत आहे.

१. उक्त इमारतीचे परिसरात वृक्षारोपण करून त्यांची निगा राखण्याची जबाबदारी धारकाची राहील.
२. उक्त इमारतीचे परिसरात स्वच्छता राखून, परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी धारकाची राहील.
३. उक्त इमारतीमध्ये वा परिसरात मंजूर नकाश्यात दर्शविलेल्या बांधकाम व्यतिरिक्त विना मंजुरीने कोणतेही बांधकाम करू नये. केल्यास ते बांधकाम अवैध समजण्यात येईल.
४. उक्त इमारतीमध्ये वा परिसरात मंजूर नकाश्यात दर्शविलेल्या बांधकामात काही बदल करावयाचे झाल्यास या कार्यालयास पुर्व सुचना देऊन परवानगी घेणे आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतेही फेरबदल मान्य करता येणार नाही.
५. मंजूर अभिन्यासातील खुली जागा कुंपण भिंत बांधून नगर परिषदेला विनामूल्य हस्तांतरित करावे लागेल.

वास्तुतज्ञाने स्वाक्षरीने प्रमाणित केलेल्या बांधकाम नकाशाचे एक संच यासह परत पाठविण्यात येत आहे.

सहपत्र : बांधकाम नकाशा

मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी